# अण्णा भाऊ साठे यांचे कथाविश्व

**डॉ. सुलतान पिरू पवार**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
जी.टी. पाटील कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार.
sultanpawar7@gmail.com

**प्रास्ताविक —**

१९२० मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राजकारण आणि समाजकारणात प्रवेश केला. त्यांनी तत्कालीन दलित समाजामध्ये आपल्या विचारातून आणि लेखनातून आत्मभान निर्माण केले. पुढे महाड येथील चवदार तळ्याचे सत्याग्रह, नाशिकचे काळाराम मंदिर प्रवेश, बौद्ध धर्माची दीक्षा यासारख्या दलित मुक्ती चळवळीतून त्यांनी दलित समाजामध्ये अस्मिता निर्माण केली. आणि त्याची परिणती मराठी वाङ्मयात दलित साहित्याच्या निर्मितीत झालेली दिसून येते. विचारवंत कार्ल मार्क्स यांच्या तत्त्वज्ञानावर आधारित १९१७ मध्ये झालेल्या 'रशियन राज्यक्रांती'ने जगभरात कामगारांना संघटित होण्याचा संदेश दिला. या क्रांतीच्या प्रभावाने १९२० नंतर देशात अनेक शेतकरी आणि कामगारांच्या संघटना निर्माण झाल्या. आणि या कामगार चळवळीतून प्रस्थापित शोषक, भांडवलशाही विरोधात आपल्या न्याय्य-हक्कांसाठी संघर्ष करू लागल्या. त्याचे प्रतिबिंब मराठीमध्ये निर्माण झालेल्या मार्क्सवादी साहित्यातून उमटल्याचे दिसून येते.

आंबेडकरांच्या विचारांतून, कार्यातून, लेखनातून आणि मार्क्सवादी विचार व कार्यातून प्रेरणा शोधून अनेक मराठी साहित्यकारांनी वंचित, उपेक्षित, पिढीत, बहिष्कृत, 'नाही रे' वर्गाचे चित्रण आपल्या साहित्यातून केले, त्यात अण्णा भाऊ साठे यांचे नाव आघाडीवर येते. शाळेत शिक्षण नाही. पोट भरण्यासाठी त्यांनी खडतर संघर्ष केला आहे. कामगारांचे जीवन, त्यांचा जीवघेणा संघर्ष, त्यांचे मोर्चे, कॉम्रेड श्रीपाद डांगे यांच्या विचारांचा प्रभाव यामुळे कम्युनिस्ट विचारसरणी स्वीकारली. पुढे त्यांनी 'चलेजाव' आंदोलनात सहभाग घेतला. त्यांनी अनेक साहित्य प्रकारात लेखन केले आहे. अण्णा भाऊ साठे हे शाहीर, कथाकार, कादंबरीकार, नाटककार म्हणून ओळखले जातात. आणि त्यांनी त्यांच्या कथांमधून सामान्य लोकांच्या जीवनाचा संघर्ष अधोरेखित केलेला आहे.

**साहित्यकार अण्णा भाऊ साठे -**

अण्णा भाऊ साठे यांनी साहित्यात कथा, कादंबरी लिहिल्या. त्यांच्या साहित्याने तळागाळांतील वंचितांचे दुःख, वेदना मुखर केली. मुंबईच्या बकाल वस्त्यांमध्ये ते राहिले 'जे जीवन जगलो, जे अनुभवले, पाहिले, तेच मी आता लिहीत आहे. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही.' असे अण्णा भाऊ सांगतात. आपल्या माणसांच्या जगण्याचा भरीव आशय पाठीशी ठेवून त्यांनी आपले कथात्म साहित्य निर्माण केले. अण्णा भाऊंनी निर्मिलेली साहित्यसंपदा विपुल आहे. पोवाडे, लावण्या, नाटके, लोकनाट्ये, प्रवासवर्णन, कथा, कादंबऱ्या इ. वाङ्मयप्रकार त्यांनी आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्याने सहजपणे हाताळले. त्यांचे संपूर्ण साहित्य मानवतावादाने ओतप्रोत भरलेले आहे. त्यांचा एकूण साहित्याचा केंद्रबिंदू 'माणूस' हाच आहे. म्हणून त्यांना 'दलित कथेचे शिल्पकार' मानले जाते.

अण्णा भाऊ हे मार्क्सवादी विचारांचे होते. त्यांचे एकूण तेरा कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. सोबत त्यांच्या 'चित्रा', 'माकडीचा माळ', 'संघर्ष', 'फकिरा', 'वैजयंता' इ. कादंबऱ्या प्रकाशित आहेत. 'स्तालिनग्राडचा पोवाडा', 'मुंबईचा गिरणी कामगार', 'बंगालची हाक', 'रवि आला लावुनि तुरा', 'दुनियेची दौलत सारी', 'माझी मैना गावावर राहिली', 'जग बदल घालुनी घाव', 'मुंबईची लावणी' इ. पोवाडे व लावण्या. 'इनामदार नाटक', 'अकलेची गोष्ट', 'माझी मुंबई अर्थात मुंबई कोणाची?', 'दुष्काळात तेरावा', 'पुढारी मिळाला' इ. लोकनाट्ये. आणि 'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवासवर्णन अशी साहित्यसंपदा अण्णा भाऊंची आहे.

आर्थिक विषमतेमुळे मानवाच्या वाट्याला दुःखभोग आले, असे मार्क्सला वाटत होते. तर सामाजिक विषमता हेच

सर्व मानवी दु:खांचे मूळ आहे असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. म्हणून या विचारवंतांनी आर्थिक व सामाजिक समतेसाठी संपूर्ण हयात वेचली. 'ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून; ती दलितांच्या म्हणजेच श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे' या अण्णा भाऊंच्या अवतरणातून मानवाच्या सुखासाठी श्रमिकांचे कठोर कष्टच कारणीभूत आहेत, असे सूचित होते. तर 'जग बदल घालुनी घाव। सांगून गेले मला भिमराव' या काव्यपंक्तीतून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी विचारांचा पुरस्कार करतात. अण्णा भाऊंच्या कथात्म साहित्यातील सर्व व्यक्तिरेखा मार्क्सवाद, आंबेडकरवाद म्हणजेच मानवतावाद यांनी भारलेल्या आढळतात. अण्णा भाऊंच्या कथा-कादंबऱ्यांच्या निर्मितीमागे व्यापक मानवतावादी प्रेरणा होती.

**अण्णा भाऊंची कथा -**

अण्णा भाऊंनी १९४५ च्या, सुमारास कथालेखनाला प्रारंभ केला त्यांचा 'खुळंवाडी' हा पहिला कथासंग्रह आहे. तो १९५७ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'बरबाद्या कंजारी' १९६० मध्ये आला. 'ठासलेल्या बंदुका' हा कथासंग्रह १९७२ मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर 'कृष्णाकाठच्या कथा', 'गुऱ्हाळ', 'निखारा', 'नवती', 'फरारी', 'भुताचा मळा', 'मास्तर', 'रानगा', स्वप्नसुंदरी', 'लाडी' इ. महत्त्वाचे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यात त्यांनी विपुल संख्येने कथा प्रकाशित केल्या आहेत.

त्यांनी आपल्या कथेतून दलित माणसाचे सामाजिक मनच व्यक्त केले आहे. समाजव्यवस्थेने नाकारलेल्या वंचित माणसांबद्दल त्यांच्या मनात अपार करुणा आहे. त्यांच्या माणसांची सृष्टी त्यांची आपलीही होती. ते एके ठिकाणी लिहितात, 'प्रतिभेला वास्तवाची गरज असते, कल्पनेलाही जीवनाचे पंख असणे आवश्यक असते. अनुभूतीला सहानुभूतीची जोड नसेल तर आपण का लिहितो याचा पत्ताच लागत नाही. ज्यांच्याविषयी मी लिहितो ती माझी माणसं असतात.' अशा प्रकारे अण्णा भाऊंचे कथावाङ्मय उपेक्षित, वंचित, पीडित, शोषित जगातील माणसांचे प्रत्ययकारी चित्रण करते. 'बरबाद्या कंजारी', 'सापळा', 'रक्ताचा टिळा', 'बिलवरी', 'कोंबडी चोर', 'थडग्यातील माणसं', 'रामोशी', 'विष्णूपंत कुळकर्णी', 'उपकाराची फेड', 'डोळे', 'भूताचा मळा',' स्मशानातील सोनं', 'प्रायश्चित्त', 'मकुल मुलाणी', 'अमृत', 'जोगीण', 'लाडी', 'तमासगीर', 'काडीमोड' इ. कथा. त्यांच्या महत्त्वपूर्ण आहेत.

अण्णा भाऊंनी आपल्या कथांमध्ये वंचित माणसाच्या भूकेबद्दल भेदकपणे रेखाटले आहे. या दृष्टीने 'स्मशानातील सोनं' ही कथा महत्त्वाची आहे. भीमा नावाच्या माणसाची ही भयावह आणि भयंकर वास्तवाला चित्रित करणारी कथा आहे. 'थडग्यातील हाड', 'विष्णुपंत कुलकर्णी', 'चोराची संगत', 'कोंबडीचोर' ह्या कथांमध्ये प्रस्थापित व्यवस्थेमुळे एका विशिष्ट वर्गात निर्माण झालेल्या गरिबीमुळे आणि गुलामगिरीमुळे भुकेचे वास्तव प्रकट झाले आहे. या बाबत डॉ. सुभाष पुलावळे लिहितात की, "दलित कथेच्या मुलाशी असणारे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भुकेचे चित्रण. ही भूक भागवणे दलित व्यक्तीला शक्य होत नाही. अन्न मिळवण्यासाठी तो वाटेल ते करण्यास तयार असतो. स्वातंत्र्योत्तर काळातही दलितांचा पोटाचा प्रश्न सुटलेला नाही. पोटाची भूक भागविण्यासाठी अहोरात्र तो राबराब राबतो. परंतु त्याला पोटापुरते अन्न मिळत नाही. हेच चित्रण अण्णा भाऊंनी आपल्या कथेतून केले आहे."[१] माणसाची 'भूक' हा अण्णा भाऊंच्या कथासाहित्याचा विषय वारंवार होताना दिसतो. 'कोंबडीचोर' ही कथा या संदर्भात उल्लेखनीय आहे. कोंबडी चोरून जगण्याचा प्रयत्न करणारा रामू भिमाच्याच जातीचा आहे तो म्हणतो, "मला घर नाही, शेत नाही, अन्न पुढे आणि मी त्याच्या मागे धावतो आहे. तर चोरी नको करू तर काय करू?" 'कोंबडीचोर' मधील रामूचे दु:ख हे आहे की, स्वातंत्र्य मिळून काहीच उपयोग झाला नाही. या संदर्भात डॉ. बजरंग कोरडे म्हणतात, "गरिबीच एखाद्या व्यक्तीला चोरी करायला भाग पाडते. गरिबी आणि भूक नाहीशी केल्याशिवाय चोरी आणि तत्सम गुन्हे थांबणार नाहीत. स्वतंत्र भारताचे सरकार भूक आणि गरिबी कमी करेल असे वाटले होते. परंतु जनतेचा भ्रमनिरास झाला." माणसाला दोन वेळचे जेवण सुखासुखी मिळत नसेल तर हे स्वातंत्र्य काय कामाचे? म्हणून तर कवी नामदेव ढसाळ व्यवस्थेला प्रश्न करतात. "स्वातंत्र्य कंच्या गाढवीचं नाव?" कोंबडीचोर रामूचे दु:ख आहे की, हे स्वातंत्र्य माझ्यात काडीचाही बदल करू शकत नाही. मग मला काय करायचं आहे? आणि तो पुढे म्हणतो "तुमचं सरकार चोर पकडून तुरूंगात घालतं आणि सोडून देतं. पण चोरी का करावी लागते ह्याचा कधी विचार करीत नाही." अण्णा भाऊ साठे केवळ रामूची वेदना बोलकी करत

नाहीत; तर स्वातंत्र्यात उपाशी राहिलेल्या सामान्य जनतेच्या दु:खाला वाचा फोडीत आहेत.

अण्णा भाऊंच्या कथांची भाषाशैली वास्तववादी आहे. दलितांचे, ग्रामीण जीवन ते अनेक प्रकारच्या प्रतिमांमधून उभे करतात. या प्रतिमासृष्टी आणि भाषाशैलीविषयी डॉ.प्रकाश खरात लिहितात की, “अण्णा भाऊंची प्रतिमासृष्टी अस्सल आहे. त्याचप्रमाणे भाषाशैली सुद्धा जबरदस्त ताकदीची आहे. त्यांच्या भाषाशैलीत एकाचवेळेस करुणेची धार आहे आणि विद्रोहाची जाण आहे. ही भाषाशैली कथेतून व्यक्त होत असताना लोक, संस्कृतीचा भावस्पर्श आहे. ग्रामीण शब्दकळा, पारंपरिक लोकप्रचार, म्हणी इत्यादीमुळे शैलीला एक धारदारपणा आलेला आहे.”[२] या वरून अण्णा भाऊंच्या कथेतील भाषाशैलीतून लोकांच्या जीवनातील वास्तवसंदर्भ आविष्कृत झाल्याचे लक्षात येते.

**कथेतील व्यक्तिरेखा --**

समाजव्यवस्थेने निर्मिलेल्या आर्थिक आणि सामाजिक विषमतेविरुद्ध त्यांच्या पात्रांचा अहर्निश संघर्ष दिसतो. स्मशानातील सोनं, कोंबडीचोर, थडग्यातील माणसं, बरबाद्या कंजारी, रामोशी, यांसारख्या कथांतून दलितांच्या वेदना, व्यथा व्यक्त होताना दिसतात. अण्णा भाऊंच्या कथेतील पात्रांची जगण्याची इच्छा जबरदस्त आहे. त्यांना कोणत्याही परिस्थितीत जगायचं आहे. ती जगायला कंटाळलेली नाहीत. परिस्थितीवर स्वार होऊन जगणारी माणसं त्यांनी आपल्या कथात्म साहित्यातून चितारली आहेत.

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या कथावाङ्मयातून 'स्त्री' जीवनालाही वेगळ्याच दृष्टीने स्पर्श केलेला दिसतो. स्त्रियांच्या वाट्याला त्या केवळ 'स्त्री' असल्यामुळे अनेक दु:खांना सामोरे जावे लागते. 'डोळे' या कथेतील गीता, 'बिलवरी' या कथेतील बिलवरी, 'मानकी' या कथेतील मानकी, 'रम्मी' या कथेतील रम्मी या स्त्रियांचे भावविश्व वेगळेच आहे. त्यांनी जे जगणे स्वीकारले आहे ते समाज-व्यवस्थेने त्यांच्यावर लादलेले आहे. त्यांना 'माणूस' म्हणून व्यवस्थेने स्वीकारले नाही म्हणून त्यांच्या जीवनांची वाताहत झालेली आहे.

अण्णा भाऊंच्या कथा ह्या जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या आहेत. आपल्या कथांमध्ये त्यांनी निरनिराळी माणसे रंगविली आहेत. या संदर्भात लिहितात की, “अण्णा भाऊ साठे यांचा नायक हा धाडसी आहे. त्याप्रमाणेच त्यांची नायिकाही धाडसी आहे. त्यांनी वेगवेगळ्या स्वभावाची व्यातीरेखा आपल्या कथा वाङ्मयातून रेखाटल्या आहेत.”[३] नवा माणूस निर्माण करण्यासाठी या शत्रूंचे निर्दालन होणे आवश्यक आहे. अशा भूमिकेतून त्यांनी कथा लिहिल्या.

**स्मशानातील सोनं : एक वैशिष्ट्यपूर्ण कथा -**

अण्णा भाऊ साठे यांची 'स्मशानातील सोनं' ही एक वैशिष्ट्यपूर्ण कथा आहे. जगण्यासाठी टोकाचा संघर्ष या कथेतून चित्रित झाला आहे. या कथेतील प्रमुख व्यक्तिरेखा भिमाची आहे. या भिमाला जगण्याचा नवा मार्ग सापडतो. प्रेतांच्या राखेत सोने असते याचा शोध भिमाला लागतो आणि रात्रंदिवस स्मशान धुंडाळीत राहतो. पुरलेली प्रेते बाहेर काढून त्यांच्या अंगावरील सोनं तो ओरबाडून काढतो. कारण "मुंबई चाळून मला काम मिळालं नाही, पण मढ्याची राख चाळून सोनं मिळालं" या सत्याचा त्याला शोध लागतो. या कथेतील भिमा दगडाच्या खाणीत दगड फोडण्याचे काम करतो. त्यातून मिळणाऱ्या अल्प मजूरीत तो आपला उदरनिर्वाह करतो. कठोर परिश्रम करूनही त्याला पोटभर अन्न मिळत नाही. त्यातच भर म्हणून खाणीचे काम बंद पडते. त्यामुळे त्याचे उपजीविकेचे साधनच गेल्यामुळे स्मशानात जाऊन मेलेल्या माणसांच्या अंगावरील सोने धुंडाळत राहतो. रात्रीच्या वेळी कोल्ह्या-कुत्र्यांशी झुंज देतो. मात्र त्याची बोटे प्रेताच्या तोंडात अडकतात व तुटतात. पुढे खाणीचे काम सुरू होते. पण बोटे तुटल्यामुळे तो पुरता उद्ध्वस्त होतो. या संदर्भात डॉ. भालचंद्र फडके लिहितात, "उद्याच्या अन्नासाठी, मढ्यासाठी आपली सर्व शक्ती पणाला लावून कोल्ही आणि भिमा एकमेकांबरोबर झुंजत होते. पशू आणि मानव यांचे मृतदेहासाठी केवढे दारुण युद्ध! कोल्ह्यांना पराभूत करणाऱ्या भिमाची दोन बोटे प्रेताच्या दातांत अडकावी हाही केवढा दैवदुर्विलास! प्रेताच्या दातात अडकलेल्या बोटांना बाहेर काढण्यासाठी भिमा प्रेतावर प्रहार करू लागतो आणि ओरडतो, "भडव्या, सोड मला!" स्मशानातील सोन्यासाठी डोंगर फोडणारी बोटे भिमाला गमवावी लागतात, तेव्हा आपण अतिशय खिन्न होतो. खरंच ही भूक नसती तर जगण्यात काही अर्थ आला असता का? अन्नक्षुधा आणि कामक्षुधा या दोन्हीही शुधाच. या दोन्ही क्षुधांच्या तृप्तीसाठी माणसाला पशू व्हावे लागते."[४] पोट भरण्यासाठी माणसाने केलेल्या संघर्षाचे चित्रण अण्णा भाऊ अतिशय सामर्थ्याने

करतात. बोटे तुटली म्हणून भिमा आक्रोश करीत नाही. तर 'आता मी उद्या कसा जगणार? या चिंतेने तो उद्ध्वस्त होतो.

**मार्क्सवाद आणि आंबेडकरवादाचा प्रभाव -**

मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद ही जीवनदर्शने मानवतावादाचा पुरस्कार करणारी जीवनदर्शने होत. अण्णा भाऊंच्या कथात्म साहित्यावर या दोन्ही जीवनदर्शनांचा प्रभाव आहे. ही दोन्ही तत्त्वज्ञाने माणसाला माणसाप्रमाणे जगता यावे यासाठी झटताना दिसतात. कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन्ही महामानवांना 'माणूस' सुखी झाला पाहिजे; त्याच्या मानवी प्रतिष्ठेला कुठेही धक्का लागणार नाही असे सतत वाटत होते. मानवतावादाच्या प्रस्थापनेसाठी त्यांनी संपूर्ण हयात वेचली. अण्णा भाऊ साठे यांच्या कथात्म साहित्यातून या दोन्ही विचारधारा प्रभावीपणे प्रतिबिंबित झालेल्या आढळतात. या दोन्ही विचारधारा जागतिक म्हणजे वैश्विक कल्याण चिंतणाऱ्या विचारधारा आहेत. 'माणूस जगला पाहिजे' ही कार्ल मार्क्सची मानवतावादी भूमिका होती. आर्थिक विषमतेमुळे 'माणूस' सातत्याने विटंबित होत आलेला आहे, असे मार्क्सला वाटत होते. मार्क्सने आर्थिक विषमतेविरुद्ध लढा पुकारला होता; तर डॉ. आंबेडकरांनी सामाजिक विषमतेविरुद्ध बंड पुकारले होते.

अण्णा भाऊंनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांची पेरणी आपल्या काही कथांमधून करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना जगण्याचे नवे तत्त्वज्ञान दिले, नवे आत्मभान दिले, त्यांच्यात जागृती घडविली आणि दलितांनी विशेषतः महारांनी घाणेरडी कामे करण्यास नकार दिला. 'उपकाराची फेड' या कथेत दलित जातीमध्येही श्रेणीरचना मानली जाते; यावर बोट ठेवले आहे. या देशात 'माणूस तुच्छ जात श्रेष्ठ' अशी परिस्थिती आहे. या कथेतील चांभार महार-मांगांना तुच्छ लेखतो. तो महारा-मागांच्या चपला शिवत नाही. या कथेतील मळू महार हा या गोष्टीविरुद्ध आवाज उठवितो. मेलेली जनावरे ओढण्याचे काम नाकारतो. त्याप्रमाणे हिंदू धर्मातील रूढी-परंपरेने लादलेली बंधनेही झुगारून देण्याचे काम अण्णा भाऊंची पात्रे करतात. माणसाने सर्वांना मानवतेच्या दृष्टीने स्वीकारले पाहिजे असा संदेश अण्णा भाऊंच्या बहुतांशी कथा देताना आढळतात. भूकेने खंगलेली, पोटासाठी गावकऱ्यांच्या उष्ट्या अन्नासाठी अंगणात ताटकळत बसलेली महार-मांगांची माणसं भेटतात. या कथेतून अण्णा भाऊंनी गावगाड्यामध्ये दलितांवर होणाऱ्या अन्यायाचे, शोषणाचे चित्र उभे केले आहे.

अण्णा भाऊ साठे यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनातून अनेक कथा लिहिल्या आहेत. अन्नान्न दशा व संघर्ष दाखविणारी 'मुकुल मुलाणी' ही कथा. मालकाचा जाच, अन्याय, शिव्या सहन करून पोटासाठी लाचार झालेला 'शिकार' कथेतील गंगाराम. कोंबड्या चोरून जगणारा 'कोंबडीचोर' कथेतील रामू. 'भूकेने व्याकुळ होऊन उष्टे अन्न मागणारी महार-मांगांची माणसं', 'थडग्यातील हाडं' या कथेत भेटतात. यांसारख्या कथांमधून अस्पृश्यतेसारख्या सामाजिक प्रश्नांपेक्षा आर्थिक विषमतेमुळे आलेले दाहक अनुभव अधिक प्रभावीपणे व्यक्त झालेले दिसतात. या कथा दैन्य, दारिद्य, अपमान यांनी मोडून काढलेल्या 'भूके' च्या निदर्शक आहेत.

**निष्कर्ष —**

अण्णा भाऊ यांनी तळागाळातल्या पददलित, भटक्या विमुक्त, गुन्हेगार जमातीतील माणसांच्या कथा त्यांनी लिहिल्या, त्यांची कथा श्रमिकांशी जसे नाते सांगते; तसेच दलित जीवनाशीही नाते सांगते. अण्णा भाऊ साठेच यांनी, 'पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नव्हे; तर दलितांच्या तळहातावर तरली आहे.' हा विचार मांडून, त्यातून त्यांनी समाजजीवनातील श्रमिकांचे, दलितांचे महत्त्व अण्णा भाऊंनी अधोरेखित केले आहे.

अण्णा भाऊंच्या लेखनावर मार्क्सवादाप्रमाणेच आंबेडकरवादाचाही प्रभाव होता. त्यांनी कथांमधून तळागाळातल्या पददलित, भटक्या विमुक्त, गुन्हेगार जमातीतील माणसांच्या जीवनसंघर्ष चितारला आहे. त्यांच्या कथांमधली माणसे आत्यंतिक गरीब, अज्ञानी, उपेक्षित अशी गाव कुसाबाहेरची आहेत. ज्या समाजव्यवस्थेत ती जगत आली; त्या समाज व्यवस्थेने त्यांना पावलो-पावली अपमानित केले. माणसाची 'भूक' हा अण्णा भाऊंच्या कथासाहित्याचा विषय वारंवार होताना दिसतो. त्यांचे नायक आत्मसन्मान, भूक या गोष्टींसाठी ते झगडताना दिसतात. त्यांच्या कथांमधून पोट भरण्यासाठी माणसाने केलेल्या संघर्षाचे चित्रण आढळते. अण्णा भाऊंच्या कथा वाङ्मयातील जी बंडखोरी आढळते ती मानवतेच्या प्रस्थापनेसाठीच आहे.

**संदर्भ –**

१. डॉ. सुभाष पुलावळे, 'मराठी कथा : परंपरा आणि स्वरूप विशेष', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती २०१० पृ.१३१.
२. डॉ.प्रकाश खरात, 'दलित कथा : उगम आणि विकास', सुगावा प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती १९९२, पृ.६९.
३. उ.नि., डॉ.सुभाष पुलावळे, 'मराठी कथा : परंपरा आणि स्वरूप विशेष', पृ.१३४.
४. डॉ. भालचंद्र फडके, 'दलित साहित्य वेदना व विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती २०००, पृ.१८२ व १८३.